ठाणे महानगरपालिका, ठाणे
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०२/०४/२०११

**मा. नौपाडा प्रभाग समितीची विशेष सभा**

सभा सुचना क्र.१ दिनांकः २४/०३/२०११

सभा क्रमांक १ दिनांकः ०२/०४/२०११

ठाणे महानगरपालिकेच्या मा. नौपाडा प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार दिनांकः०२/०४/२०११ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सभा सुचना क्र. १ दिनांकः२४/०३/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी सकाळी १२.४५ वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेच्या अध्यक्षस्थानी (पिठासीन अधिकारी) म्हणून मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग हे उपस्थित होते.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा. सदस्यांची नावे |
|---|---|
| १. | सौ. शांता शामजी सोलंकी |
| २. | सौ. सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे |
| ३. | श्री. नारायण शंकर पवार |
| ४. | सौ. सुजाता भास्कर पाटील |
| ५. | सौ. अनिल हिराकांत फर्डे |
| ६. | सौ. स्मिता मधुकर देशमुख |

**अनुपस्थित सदस्य**

| अ.क्र. | सन्मा. सदस्यांची नावे |
|---|---|
| १. | श्री. अशोक बारकू वैती |
| २. | श्री. विलास शिवराम सामंत |
| ३. | श्री. संजय संतू वाघूले |
| ४. | श्री. महदिप उर्फ मुन्ना बिष्ट |

मा. सचिव सभेचा अजेंडा वाचुन दाखवितात.

महापालिका सचिव यांचेकडे दिनांक २८/०३/२०११ रोजी नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी झालेले एक नामनिर्देशन पत्र पिठासीनी अधिकारी यांचेकडे सचिव सुपुर्द करतात.

**मा. पिठासीनी अधिकारीः-**

नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी नामनिर्देशपत्र सौ. स्मितर मधुकर देशमुख यांनी भरले आहे.

नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी केली असता (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे २००७ अन्वये) सौ. स्मिता मधुकर देशमुख यांचे नामनिर्देशन पत्र वैध आहे.

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २९(अ) ४ अन्वये दिनांक २ एप्रिल २०११ रोजी होणा-या नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन दाखल केलेल्या उमेदवारांस आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्यांस आपली उमेदवारी मागे घेण्यासाठी स्वतःची स्वाक्षरी केलेली लेखी नोटीस पिठासीनी अधिका-यांकडे देण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी देण्यात येत आहे.

उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली नसल्याने पिठासनी अधिकारी निकालपत्र जाहिर करतात.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
**निवडणूक निकाल पत्र**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) मधील नियम ५(२) अन्वये कोपरी प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी एक उमेदवार वैधरित्या नामनिर्देशीत झाले होते. त्यांचे नावे **१ ) सौ.स्मिता मधुकर देशमुख**

एक पद व एका उमेदवाराचे नामनिर्देशन असल्याने सौ.स्मिता मधुकर देशमुख हया **सन २०११-२०१२** या वर्षाकरीता मुबंई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे २००७ चे नियम ६(१) नुसार) **सन २०११-२०१२** या वर्षाकरीता **नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष म्हणून सौ.स्मिता मधुकर देशमुख हया बिनविरोध** निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

**पिठासीन अधिकारी**
**तथा**
**जिल्हाधिकारी, ठाणे**

**तद्नंतर पिठासीन अधिकारी नवनिर्वाचीत अध्यक्षांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करतात.**

(तद्नंतर मा. पिठासीन अधिकारी, नोपाडा प्रभाग समितीची निवडणूक सभा दुपारी १.०५ वाजता सभा संपल्याचे जाहिर करतात.)

पिठासीन अधिकारी
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

सही/- सौ. छाया मानकर
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

सभा संपल्याची वेळ दुपारी १.०५ वा.
दिनांक :- ०२/०४/२०११
महापालिका सचिव कार्यालय,